DIAC

Digital Institute for Administrative Careers

www.diac.in

Your personal classroom, your personal Dikshak

# MPSC PREPARATION TIME TABLE 2017

TARGET MPSC 2017

# सर्वात आधी आपल्याला काय काय कराव लागणार आहे त्याची एक छोटी यादी करा

वेळ ६ महिने




- Syllabus ची पूर्णपणे माहिती घेणे , अभ्यासक्रम पूर्णपणे नीट समजून घेणे .
- मागच्या वर्षीच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास .
- State board च्या पुस्तकातून सुरुवात
- Current affairs चा अभ्यास
- Notes making
- Attending DIAC lectures ( for DIAC student members )
- Basic reference books चा अभ्यास आणि **CSAT ची सुरुवात**
- Advance reference books चा अभ्यास / **CSAT सराव सुरूच**
- Notes Rivision
- Revision च्या वेळी short notes making / **csat सराव सुरूच**
- Test series
- **स्वतःचा अभ्यास किती झालाय आपण किती पाण्यात आहोत याची एक चाचणी ONE EXAM . आपली बलस्थाने ओळखणे** .
- आता असलेल्या वेळेत कमकुवत विषयांची आणखी चांगली तयारी करणे आणि revision करणे **CSAT सराव चालू ठेवणे**
- **CSAT चा भरपूर सराव आणि GS च चांगले revision आणि CURRENT च्या NOTES चे revision** ..

(अभ्यास झालेला आनंद आणि आत्मविश्वासाने पूर्वपरीक्षेला सामोरे जाणे .अपेक्षित सकारात्मक निकाल
मुख्य परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात )

खाली दिलेल्या माहिती नुसार **PRELIMS + MAINS COMMAN SYLLABUS आणि ONLY PRELIMS च्या तक्त्यातील अभ्यासक्रम** एवढा अभ्यास तुम्हाला पूर्वपरीक्षेसाठी करावा लागणार आहे आणि त्यामुळे पूर्वपरीक्षेच्या अभ्यासामध्ये तुमचा मुख्य परीक्षेचा ७०% अभ्यास होणार आहे .

| SUBJECT NAME | PRELIMS+MAINS<br>(COMMAN SYLLABUS) | ONLY PRELIMS syllabus | ONLY MAINS syllabus |
|---|---|---|---|
| HISTORY<br>इतिहास | MODERN HISTORY OF INDIA AND MAHARASHTRA.<br>आधुनिक भारताचा व महाराष्ट्राचा इतिहास | ANCIENT HISTORY<br>प्राचीन भारताचा इतिहास<br>MEDIVIAL HISTORY<br>मध्ययुगीन भारताचा इतिहास | INDIA AFTER INDEPENDENCE.<br>स्वातंत्र्योत्तर भारत |
| GEOGRAPHY<br>भूगोल | Physical, Social, Economic Geography of<br>INDIA & MAHARASHTRA | Physical, Social, Economic Geography of WORLD | भूगोल कृषि GEOGRAPHY AND AGRICULTURE. |
| Political science<br>राज्यशास्त्र | भारतीय राज्यघटना INDIAN CONSTITUTION | Maharashtra and India - Polity and Governance - Political System,Panchayati Raj,Urban Governance, Public Policy, Rights issues, etc. | भारतीय राजकारण व कायदा<br>INDIAN POLITICS (WITH SPECIAL REFERENCE TO MAHARASHTRA) AND LAW: |

www.diac.in

| SUBJECT NAME | PRELIMS + MAINS (COMMAN SYLLABUS) | ONLY PRELIMS | ONLY MAINS |
|---|---|---|---|
| **ECONOMY**<br>**अर्थव्यवस्था** | CURRENT AFFAIRS &<br>ALL BASIC CONCEPTS OF ECONOMY<br>EVERY POINT RELATED TO ECONOMY SYLLABUS | Economic and Social Development - Sustainable Development, Poverty, Inclusion,<br>Demographics, Social Sector initiatives, etc. | अर्थव्यवस्था आणि नियोजन<br>ECONOMY AND PLANNING<br>विकासाचे अर्थशास्त्र आणि कृषी<br>ECONOMICS OF DEVELOPMENT AND AGRICULTURE |
| **SCIENCE & TECHNOLOGY** | ALL CONCEPTS OF BASIC SCIENCE AND S&T | BASIC SCIENCE<br>सामान्य विज्ञान<br>PHYSICS<br>CHEMESTRY<br>BIOLOGY | विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विकास<br>SCIENCE AND TECHNOLOGY DEVELOPMENTS |
| **पर्यावरण आणि परिस्थितीकी** | CURRENT AFFAIRS RELATED TO THIS TOPICS | **General issues on Environmental Ecology, Bio-diversity and Climate Change-that do not require subject specialisation. (पर्यावरणीय परिस्थिती)** | |

www.diac.in

| SUBJECT NAME | PRELIMS + MAINS (COMMAN SYLLABUS) | ONLY PRELIMS | ONLY MAINS |
|---|---|---|---|
| मराठी<br>इंग्रजी | ✖ | COMPREHENSSION | GRAMMER & ESSAY |
| **CIVIL SERVICE APPTITUTE TEST**<br>**(CSAT)** | ✖ | **(1) Comprehension**<br>**(2) Interpersonal skills including communication skills.**<br>**(3) Logical reasoning and analytical ability.**<br>**(4) Decision - making and problem - solving.**<br>**(5) General mental ability.**<br>**(6) Basic numeracy (math)** | |

DIAC
Digital Institute for Administrative Careers

DIAC
Digital Institute for Administrative Careers

| SUBJECT NAME | ONLY MAINS |
| --- | --- |
| HRD | मानवी साधन संपत्तीचा विकास<br>HUMAN RESOURCE DEVELOPMENT |
| **HR** | मानवीहक्क<br>HUMAN RIGHTS |

*Current events of state, national and international importance.*

*(राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या चालू घडामोडी) PRELIMS +MAINS*

# Study plan & Time table
# TARGET MPSC 2017

पहिल्या प्रयत्नामध्ये यश मिळवायचे असेल त्या विद्यार्थ्यांसाठी तसेच ज्यांनी १ किंवा २ वेळा अपयश पचवले आहे त्यांच्यासाठी खास बनवलेले वेळापत्रक .

त्याआधी एक गोष्ट लक्षात घ्या कदाचित वेळापत्रक पाहून तुम्हाला वाटेल कि ,छे छे एवढा असा अभ्यास कुठे करावा लागत असतो का ?

तर लक्षात ठेवा जर परीक्षा पास होण्यास जर for example, १०० तास वाचन आणि ५० तास उजळणी (रिविजन ) असा काही अभ्यास करावा लागणार असेल तर तो तुम्हाला चुकणार नाही आज ना उद्या म्हणजे या वर्षी किंवा पुढच्या वर्षी करावाच लागेल आता हे तुमच्यावर आहे तुमच्या इच्छाशक्ती वरती आहे कि हे तुम्हाला एका वर्षात करायचं आहे कि टप्प्या टप्प्या ने म्हणजे दर वर्षी २५ तास असं करून ४ वर्षात पास व्हायचं आहे .

आणि आणखी एक महत्वाची गोष्ट माहीती असू दया ,

ती अशी कि एका एका अपयशाने तुमच्यातील अभ्यास करण्याची इच्छाशक्ती कमी होत असते आणि तुम्ही पहिल्या १ / २ वर्षात जेवढा मूळ अभ्यास करता तोच अभ्यास तुम्हाला यशस्वी बनवतो. पदवी पर्यंत बऱ्याच विद्यार्थ्यांनी कधीच सातत्याने अभ्यास केलेला नसतो ( अपवाद : अभ्यासू मुले ) परीक्षेच्या महिनाभर आधी अभ्यास करून पास होण्याची सवय ९०% विद्यार्थ्यांना आहे . हा असा प्रकार इथे जमणार नाही, इथे अभ्यासाचे सातत्य लागते अभ्यासाबाबत गंभीरपणा लागतो .

.
आधी स्वतःची अभ्यासाची औकात तपासून पहा खरंच आपण एवढा अभ्यास करू शकतो का ते एकदा तपासून पहा , इथे तुम्ही हुशार नसाल तरीचालेल पण कष्टाळू असलंच पाहिजे , कष्टाळू म्हणजे काही खड्डे खणायलां नाही जायचं, एक वेळ ते सोप्प आहे पण दिवस रात्र मन लावून अभ्यास करण्यासाठी खूप मन घटट हवं .
आपण १०वी ला असतानां तसेच १२वी ला असताना रोजचे ८ तास अभ्यास करण्याचे खूपदा ठरवलेले असते आणी शेवटी आपण काय केलं होत हे आठवा एकदा .
आम्ही तुम्हाला नाऊमेद करत नसून वस्तुस्तिथी ची जाणीव करून देत आहोत कि इथे खरोखर तुम्हाला किती कष्ट करावे लागणार आहेत .
जाहिरातबाजी (ती हि खोटीच! ) करणारे पुण्यातील कोचिंग सेंटर तुम्हाला इथंपर्यंत यायला आकर्षित करतात,एकदा तुम्ही फीस जमा केली कि तुम्हाला कुणी विचारात नाही किती वेळ अभ्यास केला? काय केलं आज ? असो,
पुण्याच्या CLASSES बद्दल आणि फसवणुकीबद्दल आपण पुढे बोलू सध्या मूळ गोष्ट समजून घ्या कि MPSC मध्ये कष्ट करावे लागतात ते कुणालाच चुकत नाहीत . आम्ही पुन्हा पुन्हा सांगतो कि तुमच्यावर अवलंबून आहे कि तुम्हाला हे कष्ट एकदाचे करून यशस्वी बनून बाहेर पडायचे आहे कि या कष्टांचे ओझे घेऊन या क्षेत्रात ३/४ वर्ष घासत बसायचं आहे.
अभ्यास करायच वेळापत्रक 15 ऑक्टोबर 2016 पासून विचारात घेतलेले आहे . पण विद्यार्थ्यांनी आजपासूनच अभ्यासाला सुरुवात केली तर त्याचा जास्त फायदा होईल .

| | | | |
|---|---|---|---|
| 15 October 2016 | Daily 6 hours study | आठवड्यातून २ दिवस सुट्टी | 90 hours |
| November 2016 | Daily 6 hours study + 4 hours of lectures | आठवड्यातून २ दिवस सुट्टी | 220 hours |
| December 2016 | Daily 7 hours study + 4 hours of lectures | आठवड्यातून 1 दिवस सुट्टी | 286 hours |
| January 2017 | Daily 8 hours study + 4 hours of lectures.(**दुपारी 2 ते ५ CSAT चाच अभ्यास** ) | आठवड्यातून 1 दिवस सुट्टी | 312 hours |
| Feb 2017. **Revision +Test series** | Daily 10 hours study + 2 hours of lectures. (**दुपारी 2 ते ५ CSAT चाच अभ्यास** ) | आठवड्यातून 1 दिवस सुट्टी | 300 hours |
| March 2017.**Only Revision** | Daily 12 hours study.**दुपारी 2 ते 6 CSAT** | 15 दिवसांनी 1 दिवस पूर्ण break. | 360 hours |
| April ------------------------- | MPSC PRELIMS 2017 | २८५ तास csat + 1283 hours GS | 1568 hours of study. |
| 5.5 MONTHS | 165 DAYS | Quality Study | PRELIMS PASS GUARANTEED |

# मागील वर्षाच्या Question papers चा अभ्यास & अभ्यासक्रम

२०१४-२०१५ पर्यंत चे पूर्वपरीक्षेचे तसेच मुख्य परीक्षेचे पेपर्स .

सर्वात आधी तुम्हाला mpsc चा syllabus नीट वाचवा लागेल . Syllabus काय आहे? कसा आहे ?काय काय विषय आहेत ? हे सर्वात आधी नीट समजून घ्याव लागेल . त्यानंतर मागच्या काही वर्षातील पूर्व आणि मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिका घेऊन त्या वाचून काढाव्यात . Syllabus माहिती झालाय विषय माहिती झालेत मग आता त्या विषयांवर प्रश्न कसे विचारले जातात हे माहिती करण्यासाठी या प्रश्नपत्रिका आपण वाचतो .
यातून आपल्याला लक्षात येईल कि विचारले जाणारे प्रश्न कोणत्या स्वरुपात आहे आणि त्यांची खोली किती आहे म्हणजे तुम्हाला विषय अभ्यासताना किती खोलवर अभ्यास करावा लागणार आहे .
Mpsc चा अभ्यासक्रम खूप व्यापक असल्याने या प्रश्नपत्रिका अभ्यासाचा तुम्हाला अभ्यास करताना खूप फायदा होईल . उगीच बाकी मुलांसारख गधा मेहनत न करता स्मार्ट अभ्यास करायची ही पहिली सुरुवात आहे त्यामुळे सर्वात आधी विद्यार्थ्यांनी ही गोष्ट करावी . याबाबतचे detail lecture विद्यार्थ्यांना पहिल्या आठवड्यात मिळेलच पण त्याधी विद्यार्थ्यांनी हा सराव स्वतः करून पाहावा.
*** विद्यार्थ्यांनी २०१६ चा पूर्वपरीक्षेचा पेपर पाहू नये त्याचा वेगळा प्लान आपण केलेला आहे .**

# October 2016

**पहिल्या महिन्यातील अभ्यासाचे वेळापत्रक :**

** NEWS PAPER READING

1] STATE BOARD

2] NCERT

3] ECONOMY (KOLAMBE SIR) BOOK

Or POLITY (KOLAMBE SIR) BOOK

4] current affairs march 2016 to 15 Oct. 2016

## Marathi
## STATE BOARD

| subjects | Standards |
|---|---|
| इतिहास HISTORY | 6th to 12th |
| भूगोल GEOGRAPHY | 4th to 12th |
| सामान्य विज्ञान BASIC SCIENCE | 6th to 10th |

DIAC
Digital Institute for Administrative Careers


DIAC
Digital Institute for Administrative Careers

# Suggested Important basic Reference books

Economy

polity



Study timetable

# 7 वाजता झोपेतून उठणे

15 mint. Light  Exercise is good. no need to join gym we are not preparing for wrestling .

## 8.30 to 10.30 polity or economy book reading .

Note keywords or underline the imp sentence

सकाळच्या फ्रेश वातावरणा मध्ये अवघड वाटणारे विषय अभ्यासाला घ्यावेत .

वर्तमानपत्र  current affairs सकाळी वाचण्यापेक्षा, दिवसभरातील एखादया आळस आणणाऱ्या वेळेत वाचावे म्हणजे वेळही वाया जाणार नाही आणि अभ्यास पण होईल.

11.00 to 12.30 ………………. State board book


3.00 TO 4.00………… PAPER READING & NOTES MAKING
( April 2016 to 15oct.2016 current affairs)

9.00 TE 10.30…… STATE BOARD BOOK

उत्साह असेल तर यात आणखी एक तास वेळ वाढवू शकता आणि आणखी अभ्यास करू शकता .

पुस्तक वाचताना कसे वाचावे. 1st Reading च्या वेळेस कशा notes काढायच्या?
या notes  आपण पहिल्या revision वेळी  आणखी लहान बनवणार आहोत .
जेणेकरून दुसऱ्या  revision वेळी पूर्ण पुस्तकाच्या(11वी भूगोल) notes १० पानांमध्ये असतील आणि त्यामुळे revisions चा वेग आणि संख्या वाढेल . DIAC च्या विद्यार्थ्यांना rivision ची गरज भासणार नाही त्यांनी 11 वी चे lectures २/३ वेळा पहिले तरी काम होऊन जाईल पण बाकी विद्यार्थ्यांनी revision वरती लक्ष असू द्यावे .. कारण आपण काय विवेकानंद नाहीत जे एकदा वाचले आणि लक्षात राहिले .

Revision करणे सर्वात IMP आहे .


भूगोल 11वी (मराठी)
धडा पहिला – जगाची प्राकृतिक रचना –
पान नं 2 आणि 3

* भूभागाला प्राप्त होणारा आकार म्हणजे "भूरूप".
भूरूपांचे ढोबळ प्रकार → पर्वत, पठारे, मैदाने.

* पर्वत – 1000 मीटर पेक्षा अधीक उंची
प्रकार 4 → ① वली पर्वत ② गट पर्वत, ③ ज्वालामुखी पर्वत ④ अवशिष्ट पर्वत.
अंतर्गत प्रक्रियेमुळे तयार होतात — बहिर्गत प्रक्रियाने

* पठार → सर्व बाजूंचे उतार तीव्र असणारा, माथ्याकडे सपाट भाग असणारा, आजुबाजुच्या प्रदेशापेक्षा उंच असणारा. } पठार म्हणतात.
पठारांचे निर्मीती प्रकार – ① अंतर्गत प्रक्रियांमुळे भूभाग उंचावला जाणे.
उदा. तिबेटचे पठार
② ज्वालामुखीच्या लाव्हारस पसरल्याने तयार झालेले.
उदा. आपले दख्खनचे पठार.
③ पर्वतांच्या उतारांचे अपक्षरण (झीज) होऊन.
वर्गीकरण ① आंतर पर्वतीय ② पर्वतपदीय ③ खंडीय
आधी | पठार | नंतर


* मैदान :– उंची 100 मीटर पेक्षा कमी. (काही अपवाद)
किनारी मैदान, सरोवरीय मैदान, गाळाचे मैदान, हिमनदीय मैदान.

जगातील प्रमुख पर्वत :- ① रॉकी पर्वत –
(North) अमेरिकेच्या पश्चिम भागात. अलास्का च्या दक्षिण टोकापर्यंत → 4830 km लांब पसरलेला. रुंदी – 100 ते 400 km.
North American Cordillera चा एक भाग.
शिखर माउंट मॅकिन्ले 6194 मीटर
अॅपलेशियन पर्वत. → 2400 km लांब. पूर्व भागात
मांऊट मिचेल शिखर, प्राचीन वली पर्वत श्रेणी.



DIAC
Digital Institute for Administrative Careers



भूगोलाच्या पुस्तकामधील सर्व नकाशे लक्षपूर्वक अभ्यासले पाहिजेत . त्याने प्राकृतिक रचना लक्षात राहण्यास मदत होते




DIAC
Digital Institute for Administrative Careers



# अभ्यासाला लागणारा वेळ आणि अभ्यासाचे Target :

**१० नोहेंबर २०१६ पर्यंत चे**

अभ्यासाची गती हा पण एक महत्वाचा मुद्दा आहे . State board चे एक पुस्तक वाचायला तुम्ही २ दिवस लावले म्हणजे मग यामध्येच महिना निघून जाईल . अस केलं तर अभ्यास पूर्ण होण्यास जास्त वेळ लागेल.

जास्तीत जास्त २० ते २५ दिवसांमध्ये

विज्ञान भूगोल आणि इतिहास विषयांच्या state board च्या पहिल्या reading च्या notes तयार झालेल्या पाहिजेत .आपल्या गतीनुसार तेवढा वेळ अभ्यासाला द्यावा .

Lectures सोबत आपण त्याचे २ वेळा revision करणार आहोत.

**५ नोव्हेंबर २०१६ ला पुढील study प्लान** आम्ही सांगू तोपर्यंत हे वेळापत्रका नुसार अभ्यास करावा .

*Its time to start your action......!!!!*

आपले TARGET हे असेल कि फेब्रुवारी पर्यंत सर्व अभ्यास करून १५ FEB ला २०१६ चा झालेला पूर्वपरीक्षेचा पेपर आपण गंभीरपणे वेळ लावून सोडवणार आहोत . आणि त्याच्या ANSWER KEY वरून आपला RESULT चेक करणार आहोत . तेंव्हा जो PERFORMANCE असेल यावरून जिथे कमी पडलो असू तिथे उरलेल्या वेळेत जास्त लक्ष देऊन पूर्वपरीक्षा पास होण्याचे आपले लक्ष अजून जवळ करून घेऊ . **एक वेळा पूर्वपरीक्षा नापास होऊन एक वर्ष घालवून जी अक्कल येणार आहे ती अक्कल आपण २ महिने आधीच मिळवू आणि त्यानुसार आपला अभ्यास करून याच वर्षी पूर्वपरीक्षा पास होऊ.**

ही DIAC ची विशेष "Early fail to Early Recover" अशी strategy आहे .

विद्यार्थ्यांना याचा निश्चित फायदा होईल .

Digital Institute for Administrative Careers

"All of our plans and goals are but daydreaming if we never act on them."




HARD WORK

+

DREAMS

+

DEDICATION

DIAC

Digital Institute for Administrative Careers